द ग्लोबल टाइम्स
मराठी दैनिक
भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब
Register No. : RNI - MAHMAR /2012/44621 मुंबई अंक : ६३ वर्ष : १२
Web Site : www.theglobaltime.com शुक्रवार दि. १५ मार्च २०२४ पाने : ०८ किंमत : ₹३.००

# डॉ. दीपक तुपे यांच्या संशोधन प्रोजेक्टला पाच लाखाचे अनुदान मंजूर

**कोल्हापूर** : येथील विवेकानंद कॉलेजच्या हिंदी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. दीपक रामा तुपे यांना भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली च्यावतीने 'अहिंदी भाषी क्षेत्र में हिंदी भाषा का विकास: समस्या एवं समाधान' विषयाच्या संशोधन प्रकल्पासाठी पाच लाख रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांनी डॉ. तुपे यांना सम्मानित केले आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौतुभ गावडे, महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी आणि सर्व प्राध्यापकांनी डॉ. तुपे यांचे अभिनंदन केले आहे.

डॉ. तुपे यांना १५ वर्षे अध्यापनाचा अनुभव आहे. तसेच १२ वर्षे संशोधनाचा अनुभव आहे. त्यांनी १० वर्षे पत्रकारिता देखील केली आहे. त्यांनी आजपर्यंत १५५ राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये शोध निबंधाचे वाचन केले आहे. त्यांचे ६३ संशोधन आलेख राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पत्रिकेत प्रकाशित झाले आहेत. यापूर्वी त्यांनी 'वर्तमान संदर्भ में हिंदी भाषा का रोजगारोन्मुख पक्ष' या विषयावर लघु शोध प्रकल्प पूर्ण केला आहे. तसेच त्यांचे हिंदी भाषा और सूचना प्रौद्योगिकी विषयावर पुस्तक प्रकाशित झाले आहे.